MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



पिंपरी घाटा येथे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे भाग्यविधाते माजी आमदार सुरेश आण्णा धस यांनी सदिच्छा भेट दिली त्यावेळी पिंपरी येथील सरपंच मोहन आमटे घाटा येथील सरपंच प्रल्हाद मुळीक विकास आमटे धामणगाव येथील सरपंच मनोज शेठ गाढवे आदी मान्यवर उपस्थित होते त्यावेळी घेतलेली छायाचित्र छायाचित्र सुरेश कांबळे

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०२ अंक -४४ गुरूवार दि.३१ ऑक्टोबर २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -44 THURSDAY DT.31 OCTOBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# पवार कुटुंबीय दिवाळीला एकत्र दिसतील का?

## अजित पवार म्हणाले आपल्याला दिसेलचं, पण सुप्रिया ताईंसोबत भाऊबीज, दादांनी बोलणं टाळलं

पुणे: दिवाळी म्हटलं की, बारामतीत पवार कुटुंबीय एकत्रित येण्याचा क्षण असतो. मात्र आधी लोकसभा आणि आता विधानसभेत पवार कुटुंबियांत राजकीय कटुता निर्माण झाली आहे. त्यामुळं आता या दिवाळीत पवार कुटुंबीय एकत्रित येतील का? याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे. अशातच आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांना याबाबत विचारलं असता आपल्याला दिसेलचं, असं म्हणत त्यांनी स्पष्टपणे बोलणं टाळल्याचं दिसून आलं.

आज राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः नाना काटे यांची मनधरणी करण्यासाठी त्यांच्या घरी पोहचले चर्चेनंतर जेव्हा ते जाण्यासाठी निघाले तेव्हा, माध्यमांशी अजित पवारांनी संवाद साधला त्यावेळी, सुप्रिया सुळे असं म्हणताच भाऊबीजबद्दल पत्रकार विचारतील हे हेरून दादांनी काढता पाय घेतला. पुरंदरमध्ये अजित पवारांनी उमेदवार दिल्यानं विजय शिवतारेंनी टीका केली. मला महायुतीत एकोपा ठेवायचा आहे, असं म्हणत त्यांच्यावर इतर नेते उत्तर देतील असं अजित पवार म्हणालेत. चिंचवडमधील तिढा सोडविण्याच्या दृष्टीने अजित पवारांनी नाना काटे यांची भेट घेतली. मात्र काटे माघार घेणार का? यावर ही चार तारखेला चित्र स्पष्ट होईल असं दादा म्हणाले.

दुसरीकडे मावळ विधानसभेत सुनील शेळकेंचा प्रचार करायला देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे इतर नेते येतील असा दावा ही अजित पवारांनी केला आहे. मावळ पॅटर्न अडचणीचा ठरेल का? असं विचारलं असता, थोड्या दिवसांत तोडगा निघेल असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.

अजित दादांच्या मनधरणी नंतर ही नाना काटे बंडखोरीवर ठाम



चिंचवड विधानसभेतील नाना काटे यांची बंडखोरी रोखण्यासाठी स्वतः अजित पवार यांच्या घरी पोहोचले. दोघांमध्ये जवळपास तासभर चर्चा ही झाली, मात्र त्यानंतर ही काटे बंडखोरीवर ठाम आहेत. भाजपचे शंकर जगताप आणि शरद पवार गटाचे राहुल कलाटे यांच्या विरोधात काटे यांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे.

नाना काटे अपक्ष लढणार

महायुतीकडून चिंचवडची जागा भाजपला सुटली, भाजपने शंकर जगतापांना उमेदवारी जाहीर केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत असलेले नाना काटे यांना शेवटी शरद पवारांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही. उमेदवारी न मिळाल्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक नाना काटे यांनी अखेर अपक्ष लढण्याचं जाहीर केलं आहे. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज देखील भरला आहे. त्यामुळे महायुतीकडून लढत असलेले भाजपचे उमेदवार शंकर जगताप यांना काही प्रमाणात फटका बसण्याची शक्यता आहे.

# परळीकरांची बदनामी करणाऱ्यांना मतदानातून धडा शिकवा—धनंजय मुंडे

प्रतिनिधी । परळी

सतत काही लोक निवडणुकीच्या तोंडावर परळीत गुंडगिरी दहशत शब्द वगैरे वापरून परळीच्या मतदारसंघातील परळी शहराची व परळीकरांची बदनामी करत आहेत. हितेश सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने रहात आहेत. परळी हे विकास सील शहर आहे व परिसरातील विकास कामे या मतदारसंघात पूर्णपणे होत आहेत असे विरोधकांच्या मनामध्ये त्यांच्या पोटात दुखत असल्यामुळे अशा विधानसभेच्या वेळी निवडणूक काहींना काही बोलण्यासारखे शब्द कळले अशीच घेतली मन मनामध्ये उलट जनतेने मतदानातून यांना विरोधकांना उत्तर द्यावा ही धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना आव्हान केले आहे. भावसार समाज गवळी समाज व गोंधळी समाज तसेच



परळीतील जैन समाजाच्या बांधकामाच्या धनंजय मुंडे यांच्या आज उपस्थितीत मॅरेथॉन बैठका संपन्न झाल्या यावेळी धनंजय मुंडे यांनी विविध समाज बांधवांच्या समस्या व मागण्या समजून घेतल्या समाज बांधवांच्या विविध मंदिराच्या उभारणीसाठी व समाज मंदिराच्या उभारणीसाठी जागेसह निधीचे प्रश्न सोडवले जातील असे आश्वासन धनंजय मुंडे यांनी दिली आहे. तसेच ज्या ठिकाणी रस्ते व विजेचे समस्या असतील हे प्रश्न निवडणूक संपताच ते प्रधान यांनी संतुलित जातील असे आश्वासन धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केले आहे. कधी म्हणतात परळी बोगस आहे भूत बोगस आहे. कधी म्हणतात परळीतल्या लोकांनी बोगस मतदान केले इथल्या लोकांच्या भावना व आमच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचे अनावर यांना केवळ परळीची बदनामी साधायची आहे. अशा लोकांना जनतेमधूनच धडा शिकवावा असे पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले. या बैठकांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्यासह सुरेश अण्णा टाक आयुब पठाण जगतकर एडवोकेट मंजीत सुगरे दत्ताभाऊ सावंत चेतन सौंदळे महेंद्र रोडे प्रभाकर अष्टीकर यांच्यासह प्रभाकर हजारे प्रकाश मामा सारिका तांदळे विलास सुगावे अधिक मान्यवर उपस्थित होते.









# कंत्राट रणखांब दुरुस्तीचे अन् कंत्राटदाराकडून स्थलांतराचा डाव

## दुरूस्तीसाठी साडे ५ लाख रुपये लागतातच कशाला ? ? ठेकेदार आणि अधिकारी पोसायला ? सामाजिक कार्यकर्त्यांचा सवाल:– डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नगर रोडवरील चंपावती विद्यालया समोरील ऐतिहासिक शिलालेख अर्थात रणखांबाची जतन व दुरूस्तीच्या कामासाठी पुरातत्व विभागाच्या सहायक संचालकांनी टेंडर काढुन कार्यारंभ आदेश संबंधित कंत्राटदारास दिले आहेत.परंतु सदरील शिलालेखाच्या दुरूस्ती ऐवजी तो स्थलांतरित करण्याचा घाट घातला जात असुन जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करत कंत्राटदार आणि अभियंता मनमानी कारभार करत असुन याला सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,माजी सैनिक अशोक येडे यांनी विरोध दर्शविला असुन स्थलांतर अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून समाधान कारक खुलासा झाल्याशिवाय शिलालेखाचे स्थलांतर करण्यात येऊ नये अशी मागणी करण्यात आली आहे.विशेष म्हणजे या शिलालेखाच्या दुरुस्तीसाठी ५ लाख ५९ हजार ३८२ रुपये निधीची मान्यता देण्यात आली असुन खरंच यासाठी एवढ्या निधीची आवश्यकता आहे का? केवळ कंत्राटदार आणि अधिकारी पोसण्यासाठी हा खटाटोप सुरू असल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरातुन जाणाऱ्या नगर रोडवरील राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असुन चंपावती विद्यालयासमोर बीडची ऐतिहासिक ओळख असणाऱ्या शिलालेखाच्या स्थलांतराचे काम सुरू आहे. मात्र हे स्थलांतर करत असताना संबंधित कंत्राटदार आणि अभियंता यांनी जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करत मनमानी कारभार चालवला आहे.सामाजिक कार्यकर्त्यांनी सदरील कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराकडील याबाबतची कागदपत्रे तपासली असता जिल्हा प्रशासनाचे आदेश आणि कंत्राटदार करत असलेल्या कामामध्ये तफावत आढळून आली आहे. त्यामुळे याप्रकरणी जिल्हा



प्रशासनाकडून समाधान कारक खुलासा झाल्याशिवाय शिलालेखाचे स्थलांतर करण्यात येऊ नये अशी मागणी डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,माजी सैनिक अशोक येडे यांनी करत जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

रणखांब शिलालेख जतन व दुरुस्तीसाठी ५ लाख ५९ हजार ३८२ रुपये निधीची मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये जागेच्या स्थलांतराणा विषयी कुठेही उल्लेख नाही.कंत्राटदार यांच्या म्हणण्यानुसार चंपावती शाळेची संरक्षक भिंत तोडून त्याठिकाणी शिलालेख बसविण्यात येणार आहे.परंतु शाळेने मान्यता दिलेली जागा अपुरी असुन ऐतिहासिक शिलालेखासाठी प्रशस्त जागेची आवश्यकता आहे.आणि विशेष म्हणजे शिलालेख जतन व दुरुस्तीसाठी साडे ५ लाख रुपये लागतातच कशाला ? ? कंत्राटदार आणि अधिकारी पोहायला ? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्हा हा ऐतिहासिक वारसा लाभलेला जिल्हा असुन अनेक घडामोडी घडलेल्या आहेत.त्याच्या ईतिहास कालीन खुणा जिवंत आहेत.परंतु पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे ऐतिहासिक वारसा हळुहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.बीड जिल्ह्याच्या पर्यटनामध्ये वाढ होण्यासाठी जिल्ह्यातील ऐतिहासिक वास्तुंचे जतन आणि संवर्धन करण्याच्या अनुषंगाने तत्कालीन विभागीय आयुक्त सुनिल केंद्रेकर यांनी एक परिपत्रक काढून अशा ऐतिहासिक वास्तुंचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी कमिटी नेमली होती.ज्याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत.परंतु सन २०२१ पासुन या कमिटीने यासाठी प्रयत्न केलेच नाहीत.उलट सामाजिक कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या गोष्टींकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्याचे काम केले .

# गोरगरीबांचे नेते बदामराव पंडित यांना बहुमताने विजयी करा – सहाद चाऊस

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : विधानसभा मतदारसंघात पंडित विरूद्ध पंडित अशी या विधानसभा निवडणुकीत लढत होणार असल्याने या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे या मतदारसंघातील गोरगरीब सर्व सामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारा नेता म्हणजे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्याकडे पाहिले जाते. कारण ते मतदारसंघांतील जनतेच्या मनातील खरे नेते आहेत. पाच वर्षाच्या काळात कधीही मतदारसंघात तोंड दाखवणारे नेते आज मतदारसंघात फिरून मतदारांशी सुसंवाद साधत आहेत. बदामराव पंडित हे २४ तास मतदारसंघातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी दिवस–रात्र झटणारे नेते आहेत.**



बदामराव पंडित हेच खरे गोरगरीबांचे नेते असून त्यांनाच आमदार करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील मेहनत हाती घेणार आहोत आणि या मेहनतीतून बदामराव पंडित यांना प्रचंड बहुमताने विजयी करणार आहोत असल्याचे शिवसेना गेवराई शहरप्रमुख सहाद चाऊस यांनी सांगितले आहे. गोरगरीब सर्व सामान्य जनता आणि आठरा पगड जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालणारा तसेच कार्यकर्त्यांच्या जीवाला जीव देणारा नेता म्हणजे बदामराव पंडित हेच असून त्यांना आमदार करण्यासाठी गेवराई तालुक्यातील जनता एकवटली आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात बदामराव पंडित यांचेच जास्त वर्चस्व दिसून येत असल्याने विरोधकांना डोकेदुखीचा विषय ठरला आहे. परंतु कोणीही कितीही ताकद दाखवली तरी गेवराई चे आमदार म्हणून बदामराव पंडित यांना विधानसभेत पाठवण्यासाठी जीवाचं रान करून रात्रीचा दिवस करणार असल्याचे शिवसेना शहरप्रमुख सहाद चाऊस यांनी सांगितले आहे.

# माजलगाव मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन जगताप यांचा विजय निश्चित-शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते

वीधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांच्या प्रचारार्थ आज धारूर शहरातील हॉटेल श्रावणी पॅलेस येथे महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली.याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते बोलताना असे म्हणाले की केंद्रामध्ये काँग्रेसचे सरकार असताना शेतकऱ्यांच्या कापसाचा भाव दहा ते बारा हजार रुपयापर्यंत गेला होता आणि या निर्दयी सरकारच्या काळामध्ये कापसाचा भाव सात ते साडेसात हजार रुपयांवरती येऊन ठप्प झाला आहे. या सरकारने दुसऱ्या देशातून पिकांची आयात केल्याने पिकाला भाव मिळत नाही. शेतकरी बांधवांना देशोधडीला लावण्याचे काम या सरकारने केले आहे.

आपल्या मूलभूत गरजांच्या



मालावरती यामध्ये किराणा असेल वस्त्र असतील दैनंदिन आपल्या ज्या गरजा असतील त्याच्यावरती १८% जीएसटी लावण्याचे काम केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने या राज्यांमध्ये आणि देशांमध्ये केलेले आहे.लोकशाही सर्वसामान्य लोकांसाठी काम करते लोकांचे मूलभूत अधिकार त्यांच्या गरजा आणि त्यांना सुविधा पुरविण्याचे सरकार म्हणून त्यांचं काम असतं परंतु या सरकारने हे न करता १८% आणि २८% प्रमाणे जीएसटी वसूल करून तिजोरी भरण्याचं काम केलं.सर्व जाती धर्मामध्ये भांडणे लावण्याचे काम फडणवीस शिंदे सरकारने केले.आरक्षणाच्या नावाखाली छोट्या-मोठ्या जातींमध्ये आरक्षणाच्या मुद्द्यावरून तेढ निर्माण करण्याचे काम या सरकारने केले आहे आणि आपल्या माजलगाव विधानसभेचे विद्यमान आमदार बघितले तर आमदारांना टक्केवारी सम्राट अशी पदवी दिली पाहिजे.आणि म्हणून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार बंधू भगिनींना सोबत घेऊन चालणाऱ्या महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून सर्वांच्या सुखदुःखात मदतीला धावून येणारे महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनदादा जगताप यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन केले.वा माजलगाव मतदारसंघातील शिवसैनिक मोहनदादा यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतील.. महाराष्ट्राच्या विधानभवनावरती महाविकास आघाडीचा झेंडा फडकाविण्यासाठी कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे आसे आव्हान केले...यावेळी धारूर चे माजी नगराध्यक्ष अर्जुन दादा गायकवाड, माजलगाव चे माजी नगराध्यक्ष साहील भाई चाऊस, युवासेना जिल्हाप्रमुख अभिषेक दिवे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, राष्ट्रवादीच्या जिल्हा संघटक नरीन बागवान ताई, शिवसेनेचे धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ, माजी तालुका प्रमुख विनायकरावजी ढगे, युवा सेना तालुकाप्रमुख रोहित फावडे, युवा सेना शहर प्रमुख रोहित फावडे, सोशल मीडिया तालुका प्रमुख बलभीम मुंडे, विनोद गूड पाटील, अजय गायकवाड, अमोल सिरसट, सुनील कोमटकर, अशोक आंधळे, शाम फावडे, दत्ता फावडे, वैभव कटाळे, शिवराज भोसले, बबलू जाधव, बाबा शेख, बळी वराडे,

# शहरातील नागरिकांचा पवार कुटुंबीयांवर असलेला विश्वास पुन्हा दिसून येईल – आ.लक्ष्मण पवार

## गेवराई शहरातील कार्यकर्त्यांचा मेळावा उत्साहात

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शहरातील विविध भागातील विकास कामासाठी राज्य सरकारकडून २० कोटी रूपयांचा निधी येणार होता. त्या सर्व कामाच्या वर्क ऑर्डर तयार आहेत. मात्र, दुजाभावाची वागणूक देणाऱ्या बीडच्या पालकमंत्र्यांनी जाणीवपूर्वक निधी मिळू दिला नाही. त्यामुळे, कामे सुरू करता आली नाहीत. असा गंभीर आरोप आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केला. दरम्यान, शहरातल्या घराघरात पवार कुटुंबाचे ऋणानुबंध निर्माण झालेले आहेत. त्यांच्याच आशीर्वादावर एवढ्या प्रदीर्घ काळापासून नगर परिषदेच्या माध्यमातून सत्तेवर आहोत. आमचे नाते प्रामाणिक आहे. कामापुरते नाही. एकमेकांच्या सुखादुखात आहोत. यापुढेही ते अधिक दृढ होणार आहेत. या निर्माण झालेल्या नात्यात कधीच कटुता येणार नाही म्हणूनच गेवराई शहरातील नागरीकांचा पवार कुटुंबियांवरचा असलेला विश्वास उद्याच्या विधानसभेत पुन्हा दिसून येईल असा दृढ विश्वास ही पवार यांनी व्यक्त केला आहे.

बुधवार ता. ३० रोजी सकाळी ११ वा. आ.पवार यांच्या मळ्यात गेवराई शहरातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. या प्रसंगी त्यांनी ते बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, गेवराई शहराच्या विकासासाठी वीस कोटी रूपयांची तरतूद करून ठेवलेली असताना, जळक्या वृत्तीच्या पालकमंत्र्याने जाणीवपूर्वक पैसे अडवून ठेवले. मात्र सगळे दिवस सारखे राहत नाहीत. थोडे दिवस जाऊद्या, हा सगळा निधी शहराच्या विकासासाठी पुन्हा खेचून आणून शहराच्या संपूर्ण कायापालट करू. आज पर्यंत आमच्या कुटुंबाने शहरातील सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केलेले आसून यापुढेही ते कायम राहतील. याच विश्वासाच्या बळावर शहरवासीयांनी पवार कुटुंबावर वारंवार विश्वास दाखवलेला असून प्रत्येकाशी एक नात तयार झालेलं आहे आणि यापुढेही या नात्यात कधीच कटुता येणार नाही. हाच विश्वास येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत



पुन्हा दिसून येईल, असा दृढ विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. यावेळी प्रास्ताविक करताना राजेंद्र भंडारी यांनी सांगितले की, काही राजकीय लोकांनी आमदार पवार यांची कोंडी केली. मात्र, जनता त्यांना मतदानातून उत्तर देतील, गेवराई शहरातून आण्णांना पुन्हा प्रचंड लीड मिळेल. गेवराई आणि पवारांचे नाते नव्याने सांगायची गरज नाही. लक्षण आण्णा व पवार परिवाराने शहरातील सर्व जाती धर्माच्या लोकांवर प्रेम केले आहे. ते एकवचनी आहेत. त्यांनी जे काम केलय ते मतदारसंघातील जनतेसमोर आहे. आता, यापुढची जबाबदारी मतदार मायबापांच्या हातात सून ते योग्य न्याय देतील, अशी भावना यावेळी राजेंद्र भंडारी यांनी केली आहे. या राजेंद्र राक्षसभुवनकर, ज्येष्ठ नगरसेवक जानमहोमद बागवान, शिनू भाऊ बेदरे ,राजेंद्र डी. सुतार यांची भाषणे झाली.

यावेळी शिवराज पवार, अदित्य भैय्या पवार, नगर परिषदेचे मा. अध्यक्ष सुशिल जवंजाळ,मा. उपाध्यक्ष ड. राजेंद्र राक्षसभुवनकर, ज्येष्ठ नगरसेवक जानमोहम्मंद बागवान, भगवान घुबार्डे,मा.न.प. उपाध्यक्ष दादासाहेब गिरी, राहुल खंडागळे, शिनू भाऊ बेदरे, सय्यद एजाज, राजाभाऊ मातकर, राजाभाऊ भंडारी, माणीकशेठ बागवान, जमील शेठ,रामभाऊ येवले,सतिष दाभाडे, आदिची व्यासपीठावर उपस्थित होते शहरातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ऑटो वालाच होणार परळीचा आमदार

## राजेभाऊ फड यांच्या नावाला परळी मतदारसंघातून पसंती

परळी ।प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघाचे वातावरण हळूहळू तापू लागले आहे .नेहमीपेक्षा यंदाची ही निवडणूक वेगळ्या पद्धतीने होऊ घातली आहे. राजकीय पक्षाच्या फुटाफुटीच्या गोंधळात मतदार नागरिक वैतागले असून ते वेगळ्या प्रयोगाचा शोध घेत आहेत. युवक नेते राजेभाऊ फड फड यांनी महाविकास आघाडीकडून उमेदवारी देण्याची मागणी केली होती सर्व तयारी पूर्ण झालेली असतानाही व सक्षम उमेदवार असताना पक्षाने त्यांना उमेदवार न देणे ऐनवेळी उमेदवार बदलला बदलून दिला मात्र मतदारसंघातील जनतेच राजेभाऊ फड यांच्या नावाला मोठी पसंती असल्याने दिसून येत आहे राजेभाऊ फड आतिथ्य साधारण कुटुंबात परिस्थितीतून गेले असून काही काळ त्यांनी शहरात ऑटो चालवला आहे परळी विधानसभा मतदारसंघातील पदाचे चित्र वेगळे दिसून वेगळे दिसून येऊ लागले आहे पक्षीचे समीकरण बदलले आहेत येण्याचे उमेदवार लागू लागले असून दौरे सुरू आहेत. ही मतदार संघातील नागरिकांच्या सर्वसामान्यांच्या हक्काचे माणूस म्हणून राजेभाऊ फुड. यांच्या नावाला पसंती असल्याचे दिसून येत आहे .पक्षाचे उमेदवारी डावल्याने डावली असली तरी त्यांनी पक्षाची विधानसभा निवडणूक लढवावी असा जनतेतून आग्रह दिसून येत आहे. राजेभाऊ फड यांची कौटुंबिक पार्श्वभूमी सुरुवातीपासून



काळात अत्यंत संघर्षाची होती उमेदवारीच्या काळात त्यांना परळी शहरात काय काय खातो चा चालवलेला आहे पण ते चिकाटी आणि संघर्ष करून त्यांनी उद्योग आयोग उत्तम भरारी मारून सर्वसामान्य जनतेची त्यांची नाव कायम जोडलेली आहे लोकांच्या अडचणीच्या काळात धावून जाऊन हक्काचा माणूस असे त्यांचे सर्वत्र प्रतिमा आहे त्यामुळे त्यांनी या विधानसभा निवडणुकीतून महागाव न घेता सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी निवडणूक लढवावी असा आग्रह धरला आहे जात आहे हा ऑटो चालक यंदा आमदार होणारच अशा जनतेतून निकष व्यक्त केला जात आहे.

# शहरात करू नका कोणीही चोरी

## कारण माजलगाव चे पोलीस आहेत लय भारी

माजलगाव । सुनिल थोरात

माजलगाव शहरातील समाजसेवक तरुण विजय सुतार यांचा तखतज ध७३ हा महागडा मोबाईल शहरातच चोरीला गेला होता. त्यांनी लगेच माजलगाव शहर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष दक्ष पोलीस निरीक्षक मा. राहुलजी सूर्यतळ साहेब आणि पोलीस उपनिरीक्षक मा सागरजी सोन्ने साहेब यांची भेट घेऊन माहिती दिली आणि मग काय माजलगाव शहराची दबंग पोलीस यंत्रणा कामाला लागली आणि फक्त एका महिन्यात

त्यांनी मोबाईल ट्रॅक करून विजय सुतार यांच्या ताब्यात दिला. त्यांची एवढी तत्पर कामगिरी पाहुण सर्व तरुण वर्ग त्यांची वाहवा आणि कौतुक करत आहे.माजलगाव पोलीसांची सिंघम कामगिरी पाहुण सर्व माजलगाव कर एकच चर्चा करत आहेत की माजलगाव शहरातील कोणत्याच कोपऱ्यात कोणीही चोरी करू नका कारण




माजलगाव पोलीस ॲक्शन मोड मध्ये आहेत.या कामगिरी मुळे मा. विजय भैय्या सुतार मा. लखन भैय्या फुलवरे मा. सागर भैय्या टाकणखार यांनी साहेबांच्या कामगिरी बद्दल हृदय सत्कार केला आणि थॅन्क्स माजलगाव पोलीस असे उदगार काढले.

# मनोज वाघमारे यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी निवड


## बाजीराव दादा चव्हाण यांनी रुग्णसेवेला दिला योग्य न्याय

बीड ।प्रतिनिधी

आपल्या सामाजिक व रुग्णसेवेतील कार्यामुळे एक आगळी वेगळी ओळख निर्माण करणारे बीड येथे हॉस्पिटल मधील कोणाच्याही अडचणीला कधीही धावून जाणारे, अनेक गरजू रुग्णांच्या हाकेला ओ देणारे मनोज वाघमारे यांची वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या उपजिल्हाप्रमुख पदी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथ शिंदे साहेब व मा. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे साहेब,धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवासेना मराठवाडा निरीक्षक मा.बाजीराव दादा चव्हाण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व राज्याचे कक्षप्रमुख मा.राम राऊत साहेब व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षप्रमुख मंगेशजी चिवटे साहेब यांच्या




आदेशावरून व बीड जिल्हाप्रमुख महादेवजी मातकर यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली. यावेळी धर्मवीर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा युवा सेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश भाऊ जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे,अजय सुरवसे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष उपजिल्हाप्रमुख शरद झोडगे, शहर प्रमुख कपील जोगदंड आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवडीमुळे मनोज वाघमारे यांचे जिल्ह्यात सर्वत्र स्वागत व शुभेच्छा येत आहेत.




प्रवेश ..विजयराजेंना बळ देण्यासाठी आज छावा क्रांतीवीर सेनेचे तालुका आध्यक्ष्य सुदाम मोरे आणि सहकार्याणी आज विजयराजेंच्या हस्ते राष्ट्रवादी कोंग्रेश पक्षा मध्ये प्रवेश केला

# परळीतील ज्येष्ठ पत्रकार दिलीपराव बद्दर यांच्या अकाली निधनाबद्दल धनंजय मुंडे यांनी केला शोक व्यक्त

**परळी : परळी शहरातील ज्येष्ठ पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव बद्दर यांचे अल्पशा आजाराने छत्रपती संभाजीनगर येथे उपचारादरम्यान निधन झाले असून त्यांच्या अकाली निधनाबद्दल राज्याची कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी शोक भावना व्यक्त केल्या आहेत. दिलीपराव बद्दर हे कायम चेहऱ्यावर हास्य आणि मनात सामाजिक विचार असलेले व्यक्तिमत्व होते.**

दै. सामना, लोकाशा आदी वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी निर्भीड पत्रकारिता केली. त्यांच्या अकाली निधनाने बद्दर परिवारावर कोसळलेल्या दु:खात मी सहभागी आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी स्व.दिलीपराव बद्दर यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.



# परळीकरांची बदनामी करणाऱ्यांना मतदानातून धडा शिकवा - धनंजय मुंडे

## भावसार समाज, गोंधळी समाज, गवळी समाज तसेच जैन समाजातील बांधवांच्या धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठका मंदिरे, सामाजिक सभागृह यांसह समाज बांधवांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध – धनंजय मुंडेंची ग्वाही

परळी – सातत्याने काही लोक निवडणुकीच्या तोंडावर परळीत गुंडगिरी, दहशत वगैरे शब्द वापरून परळी शहराची व शहरातील रहिवाशांची बदनामी करत आहेत. इथे सर्व समाजातील लोक गुण्या–गोविंदाने राहतात. परळी हे कायम विकसनशील शहर आहे, या शहराची व शहरातील लोकांची बदनामी करणाऱ्यांना आता जनतेने मतदानातून उत्तर द्यावे, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना केले आहे. परळी शहरातील भावसार समाज, गोंधळी समाज, गवळी समाज, रावळ समाज, तसेच जैन समाजातील बांधवांच्या धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत आज मॅरेथॉन बैठका संपन्न झाल्या. यावेळी धनंजय मुंडे यांनी विविध समाज बांधवांच्या समस्या तसेच मागण्या समजून घेतल्या.



समाज बांधवांच्या विविध मंदिरांची उभारणी तसेच सभागृहांच्या उभारणीसाठी जागेसह निधीचे प्रश्न सोडवले जातील, तसेच ज्या ठिकाणी रस्ते व विजेची समस्या आहे ते प्रश्न निवडणूक क्षमताच प्राधान्याने सोडवले जातील अशी ग्वाही यावेळी धनंजय मुंडे यांनी दिली. कधी म्हणतात परळीत बोगस बूथ आहेत, कधी म्हणतात परळीतल्या लोकांनी बोगस मतदान केले, इथल्या लोकांच्या भावनांचा व आमच्यावरील प्रेमाचा अनादर करून यांना केवळ परळीची बदनामी साधायची आहे अशा लोकांना जनतेने मतदानातूनच धडा शिकवावा असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.

या बैठकांना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्यासह सुरेश अण्णा टाक, अय्युब पठाण, प्रा.विनोद जगतकर, ऍड.मनजीत सुगरे, दत्ताभाऊ सावंत, चेतन सौंदळे, महेंद्र रोडे, अनिल अष्टेकर, यांच्यासह प्रभाकर हजारे, गोपाळ मामा, सारिका तांदळे, विलास सुगावे, अरुण अर्धापुरे, बाबू काका तांदळे, गवळी समाजातील मुन्ना बागवाले, अरुण चिखले, नितीन बागवाले, मारुती काळे, बापू शिंदे, संभाजी काळे, बंडू बागवाले,सोनाप्पा बागवाले, गोंधळी व रावळ समाजातील जगदीश इगवे, दत्ता दुलदुले, राहुल इगवे, वैजनाथ घोटकर, दीपक सुपले, सचिन मांडे, गणपत इगवे, लिंबाजी ढवळे, रतन मिरगे, नरसिंह मिरगे, गजानन रेणुके यांसह विविध समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बीड जिल्ह्यातील ट्रेनी शिक्षकांची दिवाळी पगाराविना अंधारात

टाकरवन ।प्रतिनिधी

राज्य सरकारने विधानसभा निवडणुका घोषीत होण्याच्या आधी ट्रेनी शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे. या शिक्षकांना ऑक्टोबरमध्ये पैसे दिले जाईल, असे जाहीर करण्यात आले होते, मात्र दिवाळीतही शिक्षकांना पैसे दिले नाही. सदरील शिक्षकांची दिवाळी अंधारात जाणार आहे. बीड जिल्ह्यातील एकूण १४७ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विशेष करून जिल्ह्यातील काही शिक्षकांना पैसे दिले मात्र काहींना पैसे देण्यात आलेले नाहीत.राज्यातल्या महायुती सरकारने निवडणुका घोषीत होण्याआधी विविध घोषणा केलेल्या आहेत. त्यामध्ये ट्रेनी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. ही नियुक्ती सहाम महिन्यांसाठी करण्यात आलेली होती. या शिक्षकांना ५ ऑक्टोबरला पैसे दिले जाईल, असे जाहीर करण्यात आले होते. मात्र बीड जिल्हायतील शिक्षकांच्या खात्यवर पैसे पडले नाहीत. संबंधित शिक्षकांनी शिक्षण विभागाकडे विचारना केली असता वरुनच पैसे आले नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. बीड जिल्ह्यातील एकूण ४०० पेक्षा जास्त शिक्षकांची नियुक्ती केलेली आहे. पैशाअभावी ट्रेनी शिक्षकांची दिवाळी अंधारात आहे.



# केजमधून डॉ.महावीर सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

केज ।प्रतिनिधी

केज विधानसभा राखीव मतदारसंघातून रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशा अध्यक्ष महावीर धर्मराज सोनवणे यांनी दि. २९ ऑक्टोंबर मंगळवार रोजी १२ वाजण्याच्या सुमारास साध्या पध्दतीने आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी रविराज घाटूळ, राजेश सोनवणे, जालिंदर सोनवणे, भागवत सोनवणे, जितेंद्र देशमख बंटी जोगदंड,अजिंक्य सोनवणे,आशिष यादव,शुभम वडमारे,अक्षय साळवे,इत्यादीसह रिपपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते व पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमेदवार महावीर सोनवणे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने मराठा व बौद्ध व सर्व समाजाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदउत्सव पाहायला मिळत आहे.

# साकेत कंट्रक्शन व अभियंत्यांची मनमानी

## रणखांबाची जागा बदलण्याचा कसलाही आदेश नसताना देखिल रणखांब काढला जात आहे कंत्राटदारावर कारवाहीची मागणी

रणखांब जतन व दुरुस्तीच्या नावाखाली जागा बदलण्याचा घाट असा थेट प्रश्न ऑल इंडिया पँथर्स सेनेचे बीड शहराध्यक्ष प्रेम कांबळे यांनी केला आहे

शहरातील अहमदनगर रस्त्याचे काम सुरू असून या रस्त्यावरती बीडची ऐतिहासिक ओळख दर्शवणारे रणखांब येत असल्याने तो उकडून इतर ठिकाणी हलवण्याच्या हालचाली सुरू आहेत पुरातत्त्व विभागाकडे नोंद असलेल्या अशा स्थळांची जागा बदलता येत नाही तरीही रस्त्याचे काम करणारे साकेत कंट्रक्शन आणि अभियंता भोपळे मनमानी कारभार करीत आहेत याची जागा बदलत असल्याने संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे असा प्रकार घडत असताना पुरातन विभाग अद्याप झोपेत असल्याचे दिसून येत आहे

त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांस विचारना करण्यास गेलो असता त्या ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांनी उडवा–उडवीचे उत्तर देत आमच्याकडे सर्व परमिशन कार्यारंभ आदेश आहेत असे सांगून नकाशे दाखवत आहेत तसेच जो रणखांब चंपावती शाळेच्या बाहेर असून तो रंणखांब त्या ठिकाणाहून उकडून चंपावती शाळेच्या प्रणागनाच्या मैदानात बसवण्याचे काम करत आहेत व मनमानी कारभार सुरू आहे कुठेतरी थांबले पाहिजे व रणखांब हा जमिनीत गाडला जाण्याची शक्यता आहे यामुळे रणखांब चे जतन व दुरुस्तीसाठी ५ लाख ५९ हजार ३८२ रुपये निधीस जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिली आहे यांचे कार्यरंभ आदेश ही निघाले आहे यामुळे याची दुरुस्ती होणार आहे परंतु जागा बदलण्याचे काही कुठे आदेश दिसून आले नाही परंतु या दुरुस्तीच्या नावाखाली हा रणखांब चंपावती शाळेची संरक्षण भिंत तोडून त्याच्या आत बसविण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे याची दुरुस्ती व चांगला उंच ओटा करून याचे जतन केले जावे याला कोणाचा विरोध नाही पण याची जागा बदलली जात आहे याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष घालून हा नेमका काय प्रकार व काय गोंधळ चालू आहे याबाबत खुलासा करावा अशी



मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड शहराध्यक्ष प्रेम कांबळे यांनी केलेली आहे

# माजलगाव विधानसभेच्या लढतीत पोटभरेंचा महत्त्वाचा ठरणार कौल!

## पाठिंबा ज्याला आमदारकी त्याला
## आ.सोळंके,जगताप,आडसकरांनी शाक्य निवासस्थानी घेतल्या भेटी

माजलगाव ।प्रतिनिधी

जिल्ह्याच्या राजकारणात ज्यांची फायर ब्रँड म्हणून इमेज आहे.त्या बाबुराव पोटभरे यांचा यंदाही विधानसभा निवडणुकीच्या लढतीतील कौल महत्त्वाचा ठरणार असे दिसते.पोटभरेंचा पाठिंबा ज्याला राहील त्यालाच आमदारकी मिळवण्यास सोपे जाईल असे चित्र आहे.दरम्यान त्यामुळेच माजलगाव विधानसभेच्या मैदानात तुल्यबळ असणारे उमेदवार आ.प्रकाश सोळंके,मोहन जगताप,रमेश आडसकर यांच्यासह इतरही उमेदवारांनी त्यांच्या शाक्य निवासस्थानी भेट घेऊनी त्यांची भूमिका आपल्या बाजूने असावी यासाठी प्रयत्न चालवले आहेत.

माजलगावात विधानसभा निवडणुकीचा धुरळा उडण्यास सुरुवात झाली आहे.येत्या चार तारखेला विड्रॉलनंतर येथील बरेचसे चित्र स्पष्ट होणार आहे.असे असले तरी विद्यमान आ.प्रकाश सोळंके,मोहन जगताप,रमेश आडसकर या तिघांमध्ये कडवी झुंज होणार असा अंदाज आहे. अशा टोकाच्या परिस्थितीत मात्र येथील बहुजनांचे नेते बाबुराव पोटभरे यांची भूमिका मात्र गुलदस्त्यात दिसून येत आहे. त्यामुळे संभाव्य असणाऱ्या उमेदवारांची पोटभरेंनी आपल्या व्यासपीठावर



यावं यासाठी प्रयत्न चालवले आहेत.कारण मागच्या अनेक निवडणुकांचा इतिहास आहे.पोटभरेंचा पाटिंबा ज्याला, आमदारकी त्याला.असा राहिला आहे.यंदाची निवडणूक मराठा, ओबीसी राजकीय वादात पार पडणार



आहे.त्याकारणानेही यंदा पोटभरे यांचा कौल उमेदवारांसाठी

महत्त्वाचा आहे.जाळपोळीनंतर चाललेल्या अटकसत्रावर मराठा युवकांसाठी त्यांची भूमिका समाजात त्यांच्या प्रति आदर ठेवून



आहे.ओबीसी,मराठा आरक्षणातही त्यांची समतोल भूमिका आहे. दलित मुस्लिम यांच्या न्याय प्रश्नासाठी ते नेहमी रस्त्यावर येतात.त्यामुळे जिल्ह्याचा राजकारणात त्यांचा दबदबा आहे. बहुजन नेते म्हणून त्यांना मानणारा वर्ग याठिकाणी मोठा आहे. अठरापगड जातीत त्यांचे काम आहे.सडेतोड,स्पष्ट,रोखठोक भूमिकांमुळे तरुणांमध्ये त्यांची क्रेज आहे.त्यामुळे त्यांच्या सभांना गर्दी मोठी होते.उत्साही क्राउडफुल सभा घेऊन राजकीय वातावरण बदलण्याची,घडवण्याची क्षमता त्यांच्यात आहे.त्यामुळे यंदा होत असल्या निवडणुकीतही त्यांचा कौल महत्त्वाचा आहे.त्याअनुषंगाने त्यांच्या शाक्य निवासस्थानी उमेदवारांनी गाठीभेटी सुरू केल्या आहेत.अद्याप त्यांची भूमिका अस्पष्ट आहे.परंतु लवकरच ते आपली भूमिका जाहीर करून आपल्या पाठिंबा ज्याला देतील त्याला आमदार होण्यास सोपे जाईल.असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

# मला कसल्याही परिस्थितीत बीडची जागा जिंकायचीय

बीड (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महायुतीतील बीडची जागा आपण मिळविली आहे. त्यामुळे आता सर्व मित्र पक्षांना सोबत घेऊन ताकदीने कामाला लागा. सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहचण्याची रणनीती आखावी. मला कसल्याही परिस्थितीत बीडची जागा जिंकायचीय, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांना बळ दिले.महायुतीकडून बीड विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल व अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांची डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह सहकाऱ्यांनी परळी येथे कार्यालयात बुधवारी (दि.३०) भेट घेऊन आभार व्यक्त केले. तसेच, गोपीनाथ गड येथे लोकनेते स्व.गोपीनाथजी मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी सर्व पदाधिकाऱ्यांसमोर ना.धनंजय मुंडे यांनी 'जिथे कमी तिथे आपण उभा राहील' असाच विश्वास



दिला. सर्व अडचणींवर मात करण्यासाठी मी पावलोपावली सोबत आहे, अशा शब्दात त्यांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांना लढण्यासाठी आणि जिंकण्यासाठीच बळ दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, प्रवासादरम्यान केजमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांच्या नेतृत्वाखाली युवक कार्यकर्त्यांनी सत्कार केला.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार, कार्याध्यक्ष खा.प्रफुल्ल पटेल, खा.सुनील तटकरे यांच्यासह महायुतीच्या सर्व नेत्यांचे डॉ. योगेश क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले. तसेच, धनुभाऊ व पंकजाताई यांनी आशिर्वाद व मार्गदर्शन भक्कमपणे कायम पाठीशी राहू द्यावे, अशा शब्दात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान आभार मानले.

# डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन
## महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन

बीड (प्रतिनिधी)

उमेदवारी अर्ज वैध ठरलेले महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी ग्रामदैवतांचे दर्शन घेऊन महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. ठिकठिकाणी नागरिकांनी त्यांच्या उमेदवारीचे स्वागत केले असून ते ताकदीने कामाला लागले आहेत. त्यांच्याकडे इतर पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे प्रवेश सुरू झाले आहेत.

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पदाधिकारी, कार्यकर्त्यांसमवेत बीड तालुक्यातील श्री क्षेत्र नारायण गडावरील नगद नारायण महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच, शहरातील कंकालेश्वर मंदिर, शहेंशावली दर्गा, खंडेश्वरी मंदिर, राजुरी न. येथील नवगण गणपती या ग्रामदैवताचे दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाराणा प्रताप, महात्मा बसवेश्वर, संत गाडगे बाबा, क्रांतिसूर्य महात्मा फुले व सावित्रीबाई,



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता जिजाऊ, वसंतराव नाईक पुतळा भगवान बाबा चौक, वीर सावरकर, यशवंतराव चव्हाण, स्व.द्वारकादास मंत्री या महापुरुषांसह छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी ठिकठिकाणी त्यांच्या स्वागतासाठी नागरिकांसह कार्यकर्त्यांची गर्दी दिसून आली.

माजी सरपंच श्रीराम डुकरे, कल्याण गाडेकर यांचा प्रवेश

बीड तालुक्यातील पिंपळगाव (मजरा) येथील माजी सरपंच श्रीराम डुकरे, कल्याण गाडेकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचे स्वागत करत पक्ष संघटन वाढीसाठी शुभेच्छा दिल्या.



बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी राहुल भैया सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करताना तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, उपाध्यक्ष शेख कादर बादशहा, सचिव शेख अर्शद, युवक काँग्रेसचे युवा नेते उमेश डमरे, विधानसभा अध्यक्ष हनुमान घोडके, इंटकचे सखाराम बेगडे आदी पदाधिकारी दिसत आहेत.

# युवासेनेची फौज डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी-बाजीराव चव्हाण

## बीडमध्ये महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांचा युवासेनेकडून सत्कार

बीड (प्रतिनिधी)

महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी युवासेनेची फौज उभी आहे. आपण व सर्व पदाधिकारी प्रचारामध्ये अग्रेसर राहू. सर्वांच्या साथीने बीडमध्ये महायुतीचा विजय कोणीही रोखू शकत नाही, असा विश्वास युवासेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांनी व्यक्त केला.

बीडमध्ये युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.३०) सदिच्छा भेट दिली. यावेळी आयोजित बैठकीतून बाजीराव चव्हाण हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवासेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हाप्रमुख महादेव मातकर, विलास मस्के, डॉ.जाधव आदींची उपस्थिती होती.



पुढे बोलताना ते म्हणाले की, आरोग्य क्षेत्रात डॉ.योगेश क्षीरसागर यांचे कार्य कौतुकास्पद आहे. त्यांच्या हातून अधिकाधिक जनसेवा घडावी. आपण देखील आरोग्य क्षेत्रात काम करताना हजारो लोकांची सेवा केली. तरुणांचे संघटन उभारले आहे. ही सर्व ताकद बीडचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी उभी करणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुतीच्या सर्व नेत्यांनी त्यांना उमेदवारी दिली.

# लक्ष्मीपूजन ३१ ऑक्टोबर की १ नोव्हेंबर?

दरवर्षी आश्विन/कार्तिक महिन्यातील कृष्ण पक्षातील अमावास्येला दिवाळीचा सण साजरा केला जातो. यंदा दिवाळीच्या तारखेबाबत संभ्रम आहे. काही लोकांचं म्हणं आहे लक्ष्मीपूजन ३१ ऑक्टोबर तर काही जण १ नोव्हेंबरला करायचं आहे असं म्हणत आहे. महाराष्ट्रात लक्ष्मीपूजन म्हणजे दिवाळी कधी योग्य तारीख जाणून घ्या.

हिंदू धर्मातील सर्वात मोठा उत्सव आणि सण म्हणजे दिवाळी...प्रकाशाचा हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. धनत्रयोदशी म्हणजेच धनतेरसपासून दिवाळीला सुरुवात होते. मग नरक चतुर्दशी म्हणजे दिवाळीचा पहिली आंघोळ केली जाते. या सणाला छोटी दिवाळी असंही म्हणतात. यंदा दिवाळी म्हणजे लक्ष्मीपूजनच्या तारखेबद्दल संभ्रम निर्माण झालाय. काही लोक म्हणतात दिवाळी ३१ ऑक्टोबर तर काही जण १ नोव्हेंबरला आहे. यामागे सर्व घोळ हा दोन दिवस प्रदोष काळात अमावस्या तिथी आल्यामुळे झाला आहे. अशात महाराष्ट्रात लक्ष्मीपूजन कधी करायचं याबद्दलचा गोंधळ पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण यांनी दूर केलाय.

दिवाळी कधी आहे?

आश्विनी महिन्यातील अमावस्या तिथीला दिवाळीचा सण साजरा करण्यात येतो. पंचांगानुसार अमावस्या तिथी ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजून १२ मिनिटापासून १ नोव्हेंबरला संध्याकाळी ५ वाजून ५३ मिनिटापर्यंत असणार आहे. त्यासोबत प्रदोष काळ आणि वृषभ काळ हे दोन शुभ काळ दिवाळीत पूजेसाठी महत्वाचे आहेत. ज्योतिष शास्त्रानुसार प्रदोष आणि वृषभ काळात दिवाळी पूजा किंवा लक्ष्मी पूजा करणे खूप शुभ मानले जाते.

दोन दिवस प्रदोषकाळी आश्विन अमावास्या कमी-अधिक प्रमाणात असली तरी लक्ष्मी-कुबेरपूजन दुसऱ्या दिवशी प्रदोषकालात करावे असे धर्मसिंधू, पुरुषार्थ चिंतामणी, तिथिनिर्णय, व्रतपर्व विवेक इत्यादी अनेक धर्मशास्त्रीय ग्रंथात दिलं आहे. काही ज्योतिषशास्त्र तज्ज्ञ सांगतात जर तुम्हाला अमावस्या तिथीमध्येच शुक्रवार १ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजन करायचं असेल तर ५ वाजून ५३ मिनिटापर्यंतच करावं लागणार आहे.

१९६२, १९६३ आणि २०१३ मध्येही दोन दिवस प्रदोषकालात आश्विन अमावास्या आली होती. त्यावेळीही दुसऱ्या दिवशी



लक्ष्मी-कुबेर पूजन केलं होतं असं पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक दा.कृ.सोमण यानी सांगितलंय.

लक्ष्मी पूजनासाठी शुभ मुहूर्त अमावस्या काळात - संध्याकाळी ५:३६ ते ६:१५ पर्यंत

प्रदोष काळात लक्ष्मी पूजनासाठी शुभ मुहूर्त - संध्याकाळी ५:३५ ते रात्री ०८.०६ पर्यंत

भारतात कुठल्या शहरात कधी दिवाळी ?

खरं तर उत्तर भारतीय ३१ ऑक्टोबर तर महाराष्ट्रातील मराठी लोक १ नोव्हेंबरला दिवाळी साजरी करणार आहेत. दिल्ली आणि मुंबईत ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबरला दिवाळी साजरी करण्यात येणार आहे. उत्तराखंडमध्ये १ नोव्हेंबरला, हरियाणा, बिहार आणि उत्तर भारतात ३१ ऑक्टोबरला लक्ष्मीपूजन करण्यात येणार आहे.

लक्ष्मीपूजन साहित्य लक्ष्मीपूजनकरिता काय साहित्य लागतं याविषयी आपण जाणून घेऊयात लक्ष्मी मातेचा फोटो किंवा मूर्ती गणपती बाप्पाचा फोटो किंवा मूर्ती कुबेराचा फोटो किंवा मूर्ती नाणी किंवा नोटा दागिने किंवा चांदीची नाणी एक कोरीवही घ्यावी त्यावर कुंकवाने ओम काढावा किंवा स्वस्तिक काढावा. चौरंग किंवा पाठ लाल रंगाचे कापड पाणी तांदूळ गंध पंचामृत हळद, कुंकू अक्षदा फुले विड्याची पाच पाने झाडू लाह्या बताशे

लक्ष्मी पूजन का केलं जातं ?

प्रत्येक सणामागे एक पौराणिक कथा आहे. लक्ष्मीपूजनाबाबत पण एक प्रसिद्ध कथा आहे. असं म्हणतात विष्णू देवाने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सर्व देवांना माता लक्ष्मीसह बळीच्या कारागृहातून मुक्त केलं होतं. माता लक्ष्मी ही भगवान विष्णू यांची पत्नी, त्यामुळे आपण आजच्या दिवशी आपण लक्ष्मी मातेची पूजा करतो आणि विजयाचा आनंद साजरा करतो.

लक्ष्मीपूजन विधी

लक्ष्मीपूजन विधी करण्याकरिता सर्वप्रथम देवघरामध्ये एक चौरंग ठेवावा त्यावर लाल कापड अंथरून घ्यावा. त्यावर उजव्या बाजूला कळस मांडावा त्या कळसांमध्ये पाच विड्याची पाने टाकावी, एक रुपयाची नाणी टाकावे आणि कळसाच्या वर नारळ ठेवावा त्या नारळाची शेंडी वर असली पाहिजे. आपण जो चौरंग घेतला आहे, त्या चौरंग वर मध्यभागी तांदुळाची रास करावी. त्यावर गणपती, कुबेर, लक्ष्मी यांची मूर्ती किंवा फोटो ठेवावा. जर तुमच्याकडे काहीच नसेल तर सुपारी ठेऊ शकतात. त्यानंतर चौरंगावर जागा शिल्लक असेल त्या जागेमध्ये हिशोबाची वही आणि पेन ठेवावी तसंच पैसे नाणी ठेवावे. त्यानंतर चौरंगाची हळद कुंकू लावून पूजा करून घ्यावी. फराळ आणि लाह्या बताशे यांचा नैवेद्य दाखवावा. झाडूला लक्ष्मी मानतात म्हणून नवीन झाडूची पूजा केली जाते.

# माजलगाव मतदार संघातील अपक्ष उमेदवार माधव निर्मळ यांना तात्काळ संरक्षण द्यावे

## सकल ओबीसी समाज बांधवांची मागणी

माजलगाव (प्रतिनिधी)

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार माधव निर्मळ हे प्रचारासाठी धारूर तालुक्यातील पहाडी दहिफळ पारगाव येथे एक मराठा लाख मराठा च्या घोषणा देऊन अडवले या घटनेच्या निषेधार्थ माजलगाव तालुक्यातील ओबीसी बांधवांच्या वतीने सदर घटनेचा निषेध करून त्या लोकांवर कारवाई करावी व माधव निर्मळ यांना संरक्षण द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने माधव अंबादासराव निर्मळ हे माजलगाव मतदारसंघांमध्ये निवडणुकीच्या संवाद दौऱ्यानिमित्त बैठकी घेत आहेत मागील काळामध्ये गणेशोत्सवाच्या सांस्कृतिक कार्यक्रमा निमित्त गंगामसला या गावी त्यांच्या विरोधात मराठा समाजाने



घोषणाबाजी देऊन अर्वाचे भाषेत बोलले गेले. त्यानंत दिनांक २९/१०/२०२४ रोजी पहाडी पारगाव तालुका वडवणी या गावांमध्ये नियोजित जनसंवाद बैठक असताना गावांमध्ये जाऊन दिले नाही.

१०० ते १५० समाजकंटकांनी माधव निर्मळ यांची गाडी अडवून त्यांच्या विरोधात घोषणाबाजी करत गावामध्ये येऊ दिले नाही व कार्यकर्त्यासह माधवलात्या निर्मळ यांना धक्काबुक्की करण्यात आली व त्यांच्या जिवीतास धोका व बरे-वाईट झाल्यास त्यास पोलीस प्रशासन जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. या घटनेचा आम्ही सकल ओबीसी समाज माजलगाव मतदार संघाच्या वतीने दि.३० आक्टोबर जाहीर निषेध करून महादेव निर्मळ यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी शेअर पोलीस स्टेशनमध्ये एक दिले निवेदनाद्वारे केली आहे

# पालघरमध्ये सापडलं ५ कोटीचं घबाड

## पोलिसांच्या उत्तरानं आमदार अवाक्

पालघर (प्रतिनिधी)

राज्यातील विधानसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले असून सर्वच राजकीय पक्ष मैदानात उतरले आहेत. दुसरीकडे प्रशासन आणि निवडणूक आयोगाने देखील आदर्श आचारसंहिता असल्याने कटाक्ष ठेवला आहे. प्रत्येक मतदारसंघात पोलीस व संबंधित यंत्रणा कामाला लागली असून नाकाबंदी, वाहनांची तपासणी व आचारसंहिता भंगसंदर्भाने योग्य ती खबरदारी घेत आहे. मात्र, दररोज कुठे ना कुठे रोकड किंवा अवैध पैसे, वस्तू जप्त केल्या जात आहेत. भिवंडीनंतर आज पालघरच्या उधवा येथे तलासरी पोलिसांनी तब्बल ४ कोटी ३३ लाखांची रोकड जप्त केली आहे. विशेष म्हणजे ही रोकड दादरा नगर हवेलीतून महाराष्ट्रात येत असताना ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे. पालघर जिल्ह्यातील तलासरीच्या उधवा तपासणी नाक्यावर ही रोकड आणि रोकड वाहतूक करणारी व्हॅन तलासरी पोलिसांनी ताब्यात घेतली. त्यानंतर, तलासरी येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट




पार्टीचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळतय.

निवडणुकांमध्ये सर्रासपणे पैशाचा वापर होत असून याची कसून तपासणी आता निवडणूक आयोगाने करावी, अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे डहाणूचे आमदार विनोद निकोल यांनी केली आहे. तर हे पैसे दादरा नगर हवेलीतील एका बँकेचे असल्याचं निवडणूक आयोग आणि प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, दादरा नगर हवेलीतील इतकी मोठी रक्कम महाराष्ट्राच्या हद्दीत चुकून येते कशी, असा सवाल आमदार व कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जातोय. त्यामुळे, या रकमेमागे काही गौडबंगाल तर नाही ना, असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भरारी पथके तैनात असून पोलीस यंत्रणाही सज्ज आहे. काही दिवसनापूर्वीच पुणे जिल्ह्यातील खेड शिवापूर येथे पोलिसांनी एक कार जप्त केली होती. त्यामध्ये, तब्बल ५ कोटी रुपयांची रोकड आढळून आली होती. त्यानंतर, पुणे शहरातच सोन्याच्या दागिन्यांची वाहतूक करणारा टेम्पोही पोलिसांनी ताब्यात घेतला होता. मात्र, तो टेम्पो व्यापाऱ्यांचा व मुंबईतून पुण्यात उतरत असल्याचे पोलिसांनी सांगितले होते.

१८७ कोटींची रक्कम जप्त

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ही कामगिरी केली आहे. विविध ठिकाणी पोलीस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे. यामध्ये प्रामुख्याने राज्य पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रूपये, इन्कमटॅक्स विभागाने सुमारे ६० कोटी रूपये, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रूपये यांचा प्रामुख्याने समावेश आहे. दरम्यान, मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' पवर तक्रार करता येते. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT